महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २४९ वे | दिनांक : ०५/०९/२०२६ | वार : शनिवार

## जालनेकरांचा विश्वविक्रम; ५३४८ जणांनी एकाच वेळी साकारल्या शाडूच्या गणेशमूर्ती




**जालना** : सकाळचे सात वाजण्याआधीच मैदानाकडे जाणाऱ्या रस्त्यांवर विद्यार्थ्यांच्या रांगा... हातात शाडू माती घेऊन बाप्पाला आकार देण्यासाठी आतुर झालेले हजारो हात... एका बाजूला बासरी आणि तबल्याचे सूर, तर दुसरीकडे 'गणपती बाप्पा मोरया'चा जयघोष... आणि काही मिनिटांतच जालन्याच्या नावावर नवा विश्वविक्रम नोंदवला गेला! एकाच ठिकाणी, एकाच वेळी तब्बल 5,348 शाडू मातीच्या गणेशमूर्ती तयार करून जालनेकरांनी विक्रमाची नवी नोंद केली. श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त दैनिक 'दिव्य मराठी' आणि अद्विक क्लबच्या पुढाकारातून, तसेच जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषद आणि महापालिका प्रशासनाच्या सहकार्याने जेईएस महाविद्यालयाच्या मैदानावर ही भव्य गणेशमूर्ती कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या उपक्रमाला विद्यार्थ्यांसह पालक, शिक्षक आणि प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यशाळेत 5,348 विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष शाडू मातीपासून गणेशमूर्ती तयार केल्या, तर या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी जवळपास 2 हजार पालक आणि शिक्षक मैदानावर उपस्थित होते. या उपक्रमासाठी जालन्यातील तब्बल 8 हजार नागरिकांनी ऑनलाइन मोफत नोंदणी केली होती. प्रत्यक्ष कार्यशाळेसाठी सकाळी 7 वाजताची वेळ देण्यात आली होती. मात्र, उत्साह एवढा होता की विद्यार्थी सकाळी 6.45 वाजल्यापासूनच जेईएस महाविद्यालयाच्या मैदानावर दाखल होऊ लागले. जालना शहरातील अनेक शाळांनी तर पायी रॅली काढत या उपक्रमात सहभाग घेतला. त्यामुळे कार्यशाळेचे मैदान विद्यार्थ्यांच्या गर्दीने अक्षरशः फुलून गेले. यापूर्वी बंगळुरूमध्ये 3,308 जणांनी एकाच ठिकाणी आणि एकाच वेळी शाडू मातीच्या गणेशमूर्ती तयार करण्याचा विक्रम केला होता. जालन्यातील विद्यार्थ्यांनी हा विक्रम सकाळी 7.45 वाजताच मोडीत काढला. मात्र, विक्रम मोडल्यानंतरही मैदानाकडे येणाऱ्या विद्यार्थ्यांचा ओघ थांबला नाही. अखेर सहभागींची संख्या 5,348 वर पोहोचली आणि एकाच वेळी एवढ्या मोठ्या संख्येने शाडू मातीच्या गणेशमूर्ती तयार करण्याचा विक्रम जालन्याच्या नावावर झाला. एकाच वेळी हजारो विद्यार्थी शाडू मातीला आकार देत असल्याचे दृश्य अत्यंत विलोभनीय होते. प्रशिक्षकांच्या सूचनांनुसार विद्यार्थ्यांनी माती मळून घेतली आणि टप्प्याटप्प्याने गणेशमूर्ती साकारण्यास सुरुवात केली. कोणी बाप्पाचा चेहरा घडवत होते, तर कोणी सोंड, कान आणि मुकुटाला आकार देत होते. काही वेळातच संपूर्ण मैदानावर हजारो गणेशमूर्ती आकार घेताना दिसू लागल्या. कार्यशाळेत मार्गदर्शन करणाऱ्या सुरश्री अय्यर यांनी दिलेल्या टप्प्याटप्प्याच्या सूचनांनुसार विद्यार्थ्यांनी मूर्ती तयार केली. त्यामुळे प्रथमच मातीची मूर्ती घडवणाऱ्या विद्यार्थ्यांनाही बाप्पाचे सुंदर रूप साकारता आले.

## ठाण्यामध्ये स्कूटीच्या डिकीतून साडेपाच कोटींचे 'एमडी' जप्त

**ठाणे** : ठाणे शहर पोलिस आयुक्तालयाच्या अमली पदार्थविरोधी पथकाने (गुन्हे शाखा) ड्रग्ज तस्करांचे मोठे रॅकेट उद्ध्वस्त करत आंतरजिल्हा नेटवर्कवर धडक कारवाई केली आहे. घोडबंदर रोड आणि कोपरी परिसरात मारलेल्या दोन वेगवेगळ्या धाडींमध्ये पोलिसांनी तब्बल 5 कोटी 66 लाख 37 हजार 290 रुपयांचे 'एमडी' (मेफेड्रॉन) ड्रग्ज जप्त केले असून, याप्रकरणी 4 मुख्य आरोपींच्या मुसक्या आवळल्या आहेत. ठाणे गुन्हे शाखेचे पोलिस उपायुक्त अमरसिंह जाधव यांनी सांगितले की, 1 सप्टेंबर रोजी मिळालेल्या गुप्त बातमीच्या आधारे पोलिसांनी घोडबंदर रोडवरील गायमुख बसस्टॉपजवळ सापळा रचला. तेथे संशयितरीत्या आलेल्या मोजीम अब्दुल्ला शेख (41, रा. मीरा रोड) आणि तबरेज अब्दुल्ला शेख (51, रा. ठाणे) यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या स्कूटीची (MH/०४/LG/५९०६) पाहणी केली असता डिकीत लपवून ठेवलेला 1 किलो 671 ग्रॅम एमडी ड्रग्जचा साठा आढळला. याप्रकरणी कासारवडवली पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवून आरोपींना पोलिस कोठडीत पाठवण्यात आले. बॅकवर्ड लिंकद्वारे मुख्य पुरवठादाराला नवी मुंबईतून बेड्या: दुसऱ्या कारवाईत कोपरी येथील बीएसएनएल कार्यालयाजवळ अब्दुल रहमान मोईद्दीन कादर शेख (33, रा. गोवंडी) याला 1 किलो 152 ग्रॅम एमडी ड्रग्जसह (किंमत 2,30,40,000/-) रंगेहात पकडण्यात आले. अब्दुल रहमानच्या चौकशीतून मिळालेल्या सुगाव्यावरून ड्रग्जचा मुख्य पुरवठादार आफ्रीदी मोहम्मद वली शेख (27, रा. सीवूड्स, नवी मुंबई) यालाही पोलिसांनी अटक केली.

## इंडस्ट्रियल समिट २०२६:जालन्यात लॉयड्स मेटल्सची ८ हजार कोटी गुंतवणुकीची तयारी



**जालना** : प्रख्यात लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेने जालना जिल्ह्यात 8 हजार कोटींच्या गुंतवणुकीची तयारी दर्शवली आहे. जिल्हा प्रशासन, 'जालना फर्स्ट' आणि विकास ग्रुपच्या संयुक्त विद्यमाने जालना शहरात गुरुवारी प्रथमच आयोजित 'इंडस्ट्रियल समीट 2026-द समीट टू ग्रोथ'मध्ये विकासाचा व्यापक आराखडा मांडण्यात आला. यावेळी लॉयड्स मेटल्सने नजीकच्या काळात 2 हजार कोटी व दीर्घकालीन टप्प्यात आणखी 6 हजार कोटी अशी एकूण 8 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याची इच्छा व्यक्त केली. या परिषदेत 450 उद्योजकांनी सहभाग घेतला. याप्रसंगी स्टील, सीडस्, सिल्कच्या पुढे जावून वायनरी उद्योगाला संधी असल्याचेही नमूद करण्यात आले. जिल्हा प्रशासन, 'जालना फर्स्ट' आणि विकास ग्रुपच्या संयुक्त विद्यमाने जालना शहरात गुरुवारी प्रथमच आयोजित 'इंडस्ट्रियल समिट 2026-द समीट टू ग्रोथ'मध्ये विकासाचा व्यापक आराखडा मांडण्यात आला. या परिषदेला प्रमुख पाहुणे म्हणून जेएनपीटीचे अध्यक्ष गौरव दयाल, एमआयडीसीचे सीईओ दीपेंद्र सिंह कुशवाह, विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, महिकोचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र बारवाले, जेएनपीटीचे संचालक राम भोगले, एलजी बालकृष्णन् अँड ब्रास लि.चे व्यवस्थापकीय संचालक पी. प्रभाकरन यांच्यासह 450 हून अधिक उद्योजक, गुंतवणूकदार, उद्योग व वित्तीय संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी (एमएसएमई) 20 टक्के आरक्षण व पायाभूत सुविधांयुक्त भूखंड उपलब्ध करून देण्याची ग्वाही कुशवाह यांनी दिली. यावेळी ड्रायपोर्ट ते शेंद्रा-बिडकीन रस्ता, शटल रेल्वे, नवीन एमआयडीसीसाठी जमीन संपादन व सिडको प्रकल्प पूर्ण करण्याची मागणी जालना फर्स्टचे अध्यक्ष गोविंद गोयल यांनी केली. इंडियन ऑइल कॉर्पोरेशनने विनोदराय इंजिनिअरिंग आणि रूट पाइप्ससोबत गॅस पुरवठ्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला. तर एंड्युरन्स आणि बजाजने स्थानिक पुरवठादार विकसित करण्याबाबत स्वारस्य दाखविले. या वेळी स्टील, सीडस्, सिल्कच्या पुढे जावून वायनरी उद्योगाला संधी असल्याचेही या वेळी नमूद करण्यात आले." प्रारंभी वृक्षपूजन करण्यात आले. आता हा अहवाल एमआयडीसीकडे दिला जाईल. जालन्यात उद्योग येण्यास तयार आहेत, पण जागा नाही. त्यामुळे लवकर भुसंपादन करुन पुढील सहा महिन्यात या समिटचे परिणाम दिसू लागतील. तर संपूर्ण प्रक्रिया वेग घ्यायला आणखी थोडी प्रतिक्षा करावी लागेल. त्यांची गॅस पाइपलाइन समृद्धी महामार्गाला समांतर जाते आहे. त्यांना प्रत्येक औद्योगिक क्षेत्रात गॅस कनेक्शन द्यायचे आहेत. त्यामुळे विनोदराय इंजिनीअर्सने त्यांच्यासोबत सामंजस्य करार केला आहे. फक्त याच कंपन्यांचा विचार न करता ड्रायपोर्ट सुरु झाला आहे. आता गुंतवणुकीसाठी योग्य जागा व योग्य वेळ हीच आहे. इतरही उद्योग येतील व पुढील दोन वर्षात किमान एक लाख नवे रोजगार िनर्माण होतील.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०५ सप्टेंबर २०२६


## स्वामी विवेकानंद ग्लोबल स्कूलच्या विद्यार्थ्यांचे निबंध स्पर्धेत उल्लेखनीय यश




**दौलताबाद (जावेद अहमद) :** स्वामी विवेकानंद ग्लोबल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, आसेगाव येथील विद्यार्थ्यांनी टाटा बिल्डकॉम आयोजित निबंध स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले २०४७ मधील भारत देश या विषयावर सदर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला स्पर्धेत यशस्वी ठरलेले विद्यार्थी हिंदवी मुळे,प्रगती लोखंडे,कुणाल सिरसाठ,कल्याणी बनकर,साक्षी निकम,प्राची बोचरे ,आचल गवळी,भक्ती नवले,आदर्श सोनवणे,अनुष्का सोर, हिमानी शेळके,ऋतिका बोंबले,हर्षवर्धन दळे,ऋषिकेश कांडेके सत्यम थळपती या विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शाळेच्या संचालिका गीता फाळके, सचिव रत्नाकर फाळके, प्राचार्य योगेश फाळके, मुख्याध्यापिका रोशनी कांबळे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## कवी विकास राठोड यांना राज्यस्तरीय पुरस्कार

**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** येथील प्रसिद्ध व सतत साहित्यिकांसाठी नवोपक्रम राबविणारे आणि काव्यप्रेमी म्हणून ओळखणारे कवी विकास राठोड यांच्या आतापर्यंतच्या साहित्यिक वाटचालीची दखल घेऊन बहुजन साहित्य संघ ,चिखली (बुलढाणा )या संस्थेनी २३ऑगस्ट रोजी पंढरपूर येथे आयोजित केलेल्या सातव्या राज्यस्तरीय बहुजन कविसंमेलनात हा पुरस्कार त्यांना सन्मानपूर्वक बहाल करण्यात आला .पद्मनाभ पॅलेस ,पंढरपूर या ठिकाणी पार पडलेल्या बहुजन साहित्य संमेलनात या प्रसंगी कवी विकास राठोड यांना "साहित्यिक चळवळ" हा मानाचा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.याबद्दल त्यांचे उमरगा शहर परिसरातील काव्यवर्तुळात सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.कवी विकास राठोड यांनी 2018 मध्ये "काव्यांगण" साहित्य मंच, महाराष्ट्र राज्य या समूहाची निर्मिती केली. ऑक्टोबर 2025 मध्ये त्याच माध्यमातून भव्य अशा राजस्तरीय कविसंमेलनाचे आयोजन केले. जानेवारी 2026 मध्ये राज्यस्तरीय open mic (खुल्या आणि मुक्त सादरीकरण)मैफिलीचे यशस्वी आयोजन केले होते.आता पर्यंत 18 राज्यस्तरीय ऑनलाईन काव्यस्पर्धेचे बहारदार आयोजन केले. त्याच बरोबर त्यांच्या राज्यस्तरीय दैनंदिन उपक्रमाची संख्या 250 च्या वर आहे.काव्यांगण साहित्य मंच, व्यासपीठाद्वारे कवी विकास राठोड हे नवोदित कविना हक्काचे व्यासपीठ देण्याचे प्रामाणिक कार्य करतात.त्यांच्या या अव्याहत साहित्य सेवेची दखल घेऊन त्यांना या राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## जिंतूर -सेलु तालुका कोरडा दुष्काळ ग्रस्त जाहीर करा- मा.आ.विजय भांबळे



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** दि.०४ सप्टेंबर, जिंतूर तालुक्यांत पावसाचा मागील दोन महिन्या-हून अधिक काळ खंड पडल्यामुळे पिके धोक्यात आल्याने पंचनामे न करता सरसकट आर्थिक मदत देणे तसेच मागील वर्षाचा व चालू वर्षाचा पीक विमा वितरित करण्यासाठी मा.आ.विजयराव भांबळे व राष्ट्रवादी कॉंग्रेस जिंतूरच्या वतीने तहसीलदार जिंतूर यांना लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली, यावेळी कृषी अधिकारी घुगे पुरवठा विभागाचे होळंबे व विविध विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. जिंतूर तालुक्यात यावर्षी खरीप हंगामाच्या सुरुवातीला पाऊस समाधानकारक होईल या अपेक्षेने परिसरातील शेतकऱ्यांनी कर्ज काढून, कशीबशी जुळवाजुळव करून खरीप पिकांची सोयाबीन, कापूस, तूर, मुग, उडीद, हाळद, ऊस, कांदा, राजमा व फळ बागांची मोठ्या कष्टाने पेरणी केली होती. परंतु, मागील दोन महिन्याहून अधिक काळ जिंतूर तालुक्यात पावसाने पूर्णपणे खंड पाडला आहे. कडक ऊन आणि पावसामुळे शेतातील पिके मान टाकून सुकण्याच्या मार्गावर आहेत. हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची वेळ आली असून, शेतकरी तीव्र आर्थिक व मानसिक संकटात सापडला आहे. त्यामुळे पंचनामे न करता सरसकट आर्थिक मदत करणे, पावसाच्या खंडामुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीचे पारंपरिक व जाचक अटींचे पंचनामे करत बसल्यास शेतकऱ्यांचा वेळ आणि मानसिक त्रास वाढेल. त्यामुळे कोणत्याही जाचक अटी व पंचनाम्यांची औपचारिकता न पाळता, जिंतूर व सेलू तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना सोयाबीन, कापूस, तूर, मुग, उडीद, हाळद, ऊस, कांदा, राजमा ई.पिकांसाठी सरसकट हेक्टरी २५ हजार रुपये तर फळ बागेसाठी हेक्टरी ४० हजार रुपये एवढी भरीव आर्थिक मदत तातडीने जाहीर करून खात्यात जमा करावी. मागील वर्षाचा खरीप व रब्बी पीक विमा तात्काळ वितरित करा, मागच्या वर्षीच्या (खरीप व रब्बी) पीक विम्याची रक्कम अद्यापही अनेक पात्र शेतकऱ्यांना मिळालेली नाही. प्रशासनाने विमा कंपन्यांना सूचना देऊन मागील वर्षाचा रखडलेला पीक विमा तात्काळ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करावा. तसेच चालू वर्षाचा खरीप पीक विमा तात्काळ मंजूर करून वितरित करा, चालू खरीप हंगामात पावसाने मोठा दगा दिल्यामुळे नैसर्गिक आपत्ती ओढवली आहे. चालू वर्षाच्या खरीप पिकाचा पीक विमा तात्काळ मंजूर करून, अंतरिम मदत म्हणून विमा रक्कम तातडीने वितरित करावी. तसेच जिंतूर व सेलू दोन्ही तालुके दुष्काळग्रस्त घोषित करा, जिंतूर व सेलू तालुक्यात पावसाच्या खंडामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीची गंभीर दखल घेऊन या दोन्ही तालुक्यांना 'दुष्काळग्रस्त' किंवा 'कमी पावसामुळे प्रभावित क्षेत्र' घोषित करण्यात यावे, जेणेकरून शेतकऱ्यांना वीज बिल माफी, कर्ज वसुलीला स्थगिती व इतर शासकीय सवलती तात्काळ मिळू शकतील. तसेच या निवेदनाची गंभीर व तात्काळ दखल घेऊन सदर मागण्या शासन दरबारी पाठवून शेतकऱ्यांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी त्वरित पावले उचलावीत, अन्यथा परिसरातील शेतकऱ्यांना नाइलाजाने लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलनाचा पवित्रा घ्यावा लागेल, याची नोंद घ्यावी. अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली. या निवेदनावर मा.आ.विजयराव भांबळे, तालुकाध्यक्ष लक्ष्मणराव बुधवंत, जि.पं.सदस्य अजयराव चौधरी, माणिकराव हरकळ, शंकरराव जाधव, माजी जि.पं.सदस्य विश्वनाथ राठोड, बाळासाहेब घुगे, विठ्ठलराव घोगरे, पं.स.सदस्य नंदकिशोर अंभूरे, अविनाश मस्के, मुजाहेद कादरी, माजी सभापती मधुकरराव भवाळे, गणेशराव इलग, शरद अंभूरे, विजय खिस्ते, नगरसेवक जाबेर भाई, करीम लाला, माजी नगरसेवक मनोहर डोईफोडे, यांच्यासह अनेक कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात शेतकरी व नागरिक उपस्थित होते.

## टापरगाव येथे मराठा समाजाच्या वतीने रास्ता रोको आंदोलन



**कन्नड (अरुण थोरात) :** टापरगाव ता.कन्नड येथे धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर मराठा समाजाच्या वतीने दि.04 सप्टेंबर रोजी शांततेत रास्तारोको आंदोलन करण्यात आले.हैद्राबाद सह सातारा, औंध गॅझेट लागू करा, प्रलंबित कुणबी जातप्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र प्रदान करा, आंदोलकां वरील गुन्हे मागे घ्या, मराठा विद्यार्थ्यांच्या सवलतींची अंमलबजावणी करा, आत्महत्याग्रस्त मराठा कुटूंब सदस्यांना नोकरी द्या, आदी मागण्यांसाठी मराठा आरक्षण संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांचे अंतरवली सराटी येथे गेल्या सात दिवसांपासून उपोषण सुरू आहे. मात्र सरकार याकडे दुर्लक्ष करीत असल्याने, मनोज जरांगे पाटील यांना समर्थनार्थ तसेच मराठा समाजाच्या मागण्या सरकारने तात्काळ मंजुर करण्याच्या मागणी साठी पंचक्रोशीतील शेकडो समाज बांधव या आंदोलनात सहभागी झाले होते. एक मराठा लाख मराठा, मराठा समाजाच्या मागण्या मान्य झाल्याच पाहिजे, आदी घोषणा देण्यात आल्या. यामुळे काही काळ महामार्गावरील वाहतूक खोळंबली होती.पोलीस प्रशासनने चोक बंदोबस्त ठेवून सहकार्य केले. शेवटी प्रशासनाला आपल्या मागण्यांचे निवेदन देऊन समारोप करण्यात आला.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क | एम.फिल-पी.एच.डी. थेसिस | मराठी, हिंदी, इंग्रजी | कलर प्रिंट स्कॅनिंग | झेरॉक्स | स्पायरल बायंडिग | लॅमिनेशन | थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०५ सप्टेंबर २०२६


## राष्ट्र निर्माता शिक्षक

राब राबतो शाळेत,
देशहितासाठी नित्य.
समजून घ्यावे तुम्ही,
हेच आहे कटू सत्य. १

राष्ट्र निर्माता शिक्षक,
देतो जीवना आकार.
शिस्त-संस्कार लावून,
स्वप्न करितो साकार. २

ध्येय एकच असते,
व्हावे ज्ञानाचा विस्तार.
तन मनाने करितो,
ज्ञान दानाचे प्रसार. ३

ज्ञान मुलांना देतांना,
करणार नाही भेद.
अंधश्रद्धा निर्मूलन,
देई अज्ञानास छेद. ४

सुख नांदावे विश्वात,
सर्व धर्म समभाव.
नाही करणार कधी,
वागण्यात भेदभाव. ५

शिक्षणाचे बाळकडू,
देतो सर्वांना समान.
विद्यार्थ्यांना घडवूनी,
गुरू सांभाळे कमान. ६



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## शिक्षक दिन

शिक्षकदिनाच्या दिवशी
गुरुला वंदन करूया
त्यांची शिकवण अंगीकारुनी
मार्ग यशाचा करुया

जीवनात अशक्य आहे
गुरुशिवाय ज्ञान
ज्ञानामुळेच वाढतो
समाजात आपला मान

गुरू सदा पेटविती
ज्ञानाचा अखंड दिवा
आत्मविश्वासाने चालण्याचा
मार्ग दाखविती नवा

गुरू मुळेच लाभले
आपल्या जीवनी यश
घेऊया नभी भरारी
तोडूनी संकटाचे पाश

गुरूची महिमा
जगी आहे थोर
संस्काराची शिदोरी देणारा
राष्ट्राचा खरा शिल्पकार



**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.9011559106**

## त्रैमासिक 'तिफण'चे शेतकऱ्यांसाठी नवे वैचारिक व्यासपीठ - 'शिवार संसद'

**कन्नड :** शेती व शेतकरी हाच तिफणचा केंद्रबिंदू आहे. गेल्या अठरा वर्षांपासून तिफण हे शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी आणि वंचित समाजाचे प्रतिनिधित्व करणारे मराठीतील एक महत्त्वपूर्ण त्रैमासिक म्हणून ओळखले जाते. आजवर तिफणने वाचक चळवळ, कवी संमेलने, लेखक-वाचक मेळावे, साहित्य स्पर्धा, पुस्तक प्रकाशने, सुखना बचाव आंदोलन यांसारखे अनेक यशस्वी सामाजिक व साहित्यिक उपक्रम राबविले आहेत.आता याच कार्याला पुढे नेत, शेती आणि शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी, त्यांच्या न्याय हक्कासाठी लढा उभारण्यासाठी तिफण परिवाराने 'शिवार संसद' हे नवे, स्वतंत्र आणि वैचारिक व्यासपीठ सुरू केले आहे.शिवार संसदेचे उद्देश आणि उपक्रम :शिवार संसद ही केवळ संघटना नसून ती शेतकऱ्यांच्या मनातील संसद असणार आहे. या वैचारिक व्यासपीठाच्या माध्यमातून -१ शेतीमालाला हमीभाव, कर्जमाफी, पीकविमा आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्येसारख्या गंभीर प्रश्नांवर परिसंवाद व चर्चासत्रांचे आयोजन.२.तरुण शेतकऱ्यांसाठी आधुनिक शेती, सेंद्रिय शेती, प्रक्रिया उद्योगावर प्रशिक्षण शिबिरे.३.प्रयोगशील, पुरोगामी शेतकऱ्यांच्या शेतावर अभ्यास सहली.४.शेतकरी कवी संमेलन व शिवार साहित्य संमेलनाचे आयोजन.५.दरवर्षी महाराष्ट्रातील एका गावात भव्य 'शिवार संसद' भरवून शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर थेट बांधावर विचारमंथन.६.उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्रयोगशील शेतकरी, शेतकरी लेखक आणि शेतकरी चळवळीतील कार्यकर्त्यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.ही शिवार संसद शेतकऱ्यांच्या बांधापासून ते मंत्रालयापर्यंत त्यांचा आवाज पोहोचवण्याचे काम करेल.या नव्या वाटचालीत महाराष्ट्रातील सर्व शेतकरी, शेतकरी पुत्र, लेखक, विचारवंत, सामाजिक कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन त्रैमासिक तिफणचे संपादक तथा शिवार संसदचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शिवाजी हुसे, डॉ. रामचंद्र झाडे यांनी केले आहे.लवकरच शिवार संसदेची कार्यकारिणी व इतर पदाधिकाऱ्यांची नावे टप्प्याटप्प्याने जाहीर करण्यात येतील. अशी माहिती डॉ. शिवाजी हुसे यांनी दिली.

## रक्षाबंधनातून माणुसकीचा धागा; महिला महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींचा बालगृहातील विद्यार्थ्यांशी स्नेहसंवाद




**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. (सौ.) इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागाच्या वतीने रक्षाबंधनानिमित्त शासकीय निरीक्षणगृह/बालगृह, छत्रपती संभाजीनगर येथील विद्यार्थ्यांना राख्या बांधून रक्षाबंधनाचा सण उत्साहात साजरा करण्यात आला. समाजातील वंचित घटकांशी आपुलकीचे नाते निर्माण करून सामाजिक बांधिलकीची जाणीव विद्यार्थिनींमध्ये रुजविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम मागील २० वर्षांपासून सातत्याने राबविण्यात येत आहे.या शैक्षणिक भेटीपूर्वी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अन्विता अग्रवाल यांनी विद्यार्थिनींना तसेच समाजशास्त्र विभागाला शुभेच्छा दिल्या. निरीक्षणगृहाचे अधीक्षक श्री. सूर्यभान जंगले यांनी विद्यार्थिनींचे स्वागत करून रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या आणि बालगृहातील प्रारंभी समाजशास्त्र विभागाच्या प्रा. डॉ. आरती धनवे यांनी प्रास्ताविकातून उपक्रमाची भूमिका व सामाजिक महत्त्व स्पष्ट केले. निरीक्षणगृहाच्या श्रीमती हनवते यांनी विद्यार्थिनींना निरीक्षणगृह व बालगृहाच्या कार्याची माहिती देत रक्षाबंधन सणाचे सामाजिक व भावनिक महत्त्व विशद केले.यावेळी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी सोनाबाई गावंडे हिने "हीच आमुची प्रार्थना, अन् हेच अमुचे मागणे, माणसाने माणसाशी माणसासम वागणे" ही प्रार्थना सादर करून वातावरण भावपूर्ण केले. निरीक्षणगृहातील विद्यार्थ्यांनीही देशभक्तीपर गीत सादर करून राष्ट्रीय एकात्मता, बंधुभाव आणि सामाजिक सलोख्याचा संदेश दिला. तसेच त्यांनी विविध कलाप्रकार सादर करून आपल्या कलागुणांना वाव दिला.महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी बालगृहातील विद्यार्थ्यांना प्रेमाने राख्या बांधल्या आणि गोडधोड खाऊ देत त्यांच्याशी मनमोकळा संवाद साधला. या स्नेहपूर्ण भेटीतून रक्ताच्या नात्यापलीकडे माणुसकीचे नाते अधिक महत्त्वाचे आहे, हा भावनिक संदेश अधोरेखित झाला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अंजली खिराडे हिने केले, तर कु. ऋतुजा साळवे हिने आभार मानले. या शैक्षणिक भेटीचे नियोजन समाजशास्त्र विभागाच्या प्रा. डॉ. आरती धनवे, प्रा. डॉ. वैशाली पाटील, प्रा. डॉ. सुजाता पाटील आदींनी केले.राखी मेकिंग स्पर्धेत सोनाबाई गावंडे प्रथमया शैक्षणिक भेटीचे औचित्य साधून समाजशास्त्र विभागाच्या वतीने महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी राखी मेकिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे परीक्षण महाविद्यालयाच्या मानसशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. रजनी सेनाड यांनी केले.स्पर्धेत सोनाबाई गावंडे हिने प्रथम, कु. अंजली खिराडे हिने द्वितीय, तर कु. प्रमिला गायकवाड हिने तृतीय क्रमांक मिळविला. विजेत्या विद्यार्थिनींचे प्राचार्या डॉ. अन्विता अग्रवाल व परीक्षक प्रा. डॉ. रजनी सेनाड यांनी अभिनंदन केले.रक्षाबंधनाच्या निमित्ताने आयोजित या उपक्रमातून विद्यार्थिनींमध्ये सामाजिक संवेदनशीलता, बंधुभाव, समता आणि सामाजिक बांधिलकीची मूल्ये रुजविण्याचा समाजशास्त्र विभागाचा प्रयत्न अधोरेखित झाला.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०५ सप्टेंबर २०२६


## पावसाची हुलकावणी; विदर्भात ऑगस्ट महिन्यात तब्बल ५८% तूट



**मुंबई :** राज्यात पावसाने दीर्घकाळ दडी मारल्याने बळीराजाच्या डोळ्यात पाणी आले असून, संपूर्ण विदर्भासाठी ऑगस्ट महिना अक्षरशः दुष्काळी ठरला आहे. १ ते ३१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत विदर्भात पावसाची तब्बल ५८ टक्के तूट नोंदवली गेली आहे. पाऊस लांबल्यामुळे आणि सततच्या ढगाळ वातावरणामुळे संत्रा, सोयाबीन, कापूस तसेच पूर्व विदर्भातील धान पिकावर रोगांचा प्रादुर्भाव वाढल्याने खरीप हंगाम धोक्यात आला आहे. दरम्यान, हवामान विभागाने पूर्व विदर्भातील काही जिल्ह्यांना 'यलो अलर्ट' दिला असून पुढील आठवड्यापासून राज्यात टप्प्याटप्प्याने पाऊस जोर धरण्याचा अंदाज वर्तवला आहे. ऑगस्ट महिन्यात पावसाची मोठी घट विदर्भात १ ते ३१ ऑगस्ट या कालावधीत सरासरी २९७.१ मिमी पावसाची अपेक्षा असताना प्रत्यक्षात केवळ १२५.५ मिमी पावसाची नोंद झाली. जिल्हावार तुटीची आकडेवारी अकोला: 84% तूट (केवळ 33.5 मिमी पाऊस)अमरावती: 82% तूट (केवळ 46.4 मिमी पाऊस) यवतमाळ: 78% तूट (54.1 मिमी पाऊस) वर्धा: 73% तूट (65.5 मिमी पाऊस) नागपूर व वाशीम: प्रत्येकी 71% तूट बुलढाणा: 61% तूट चंद्रपूर: 55% तूट भंडारा: 43% तूट गडचिरोली व गोंदिया: तुलनेने स्थिती बरी; गडचिरोलीत 32% तर गोंदियात 28% तूट नोंदवली गेली. संत्र्याची मोठी गळ, धान पिकावर खोडकिडीचे संकट संत्रा उत्पादक पट्टा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अमरावती आणि नागपूर जिल्ह्यात पावसाअभावी संत्रा पिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे. मागील दोन आठवड्यांत झाडांवरचा 25 ते 30 टक्के बहर गळून पडला आहे. सततच्या ढगाळ वातावरणामुळे बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढला असून, पाऊस न आल्यास ही गळ 80 टक्क्यांपर्यंत जाण्याची भीती व्यक्त होत आहे. गोंदियात धानावर कीड अधूनमधून येणाऱ्या हलक्या सरी आणि ढगाळ वातावरणामुळे धान पिकावर खोडकिडीचा प्रादुर्भाव वाढला आहे. हातातोंडाशी आलेले पीक वाचवण्यासाठी शेतकरी कीटकनाशकांची फवारणी करत आहेत. पश्चिम विदर्भातील मूग, उडीद, सोयाबीन आणि कपाशीची पिके पाण्याअभावी सुकू लागली आहेत. विदर्भातील धरणांमध्ये ६२ टक्के पाणीसाठा पावसाने ओढ दिल्याने धरणांमधील पाणीसाठ्याची स्थितीही बेताची आहे. ३ सप्टेंबर २०२६ पर्यंतच्या आकडेवारीनुसार, संपूर्ण विदर्भातील धरणांमध्ये सुमारे ६२ टक्के उपयुक्त जलसाठा शिल्लक आहे. यामध्ये नागपूर विभागातील धरणांमध्ये ६३.०६ टक्के, तर अमरावती विभागातील धरणांमध्ये ६३.०४ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. पूर्व विदर्भात आज विजांसह पावसाची शक्यता मॉन्सूनचा आस असलेला कमी दाबाचा पट्टा आणि मध्य प्रदेशातील सक्रिय चक्राकार वाऱ्यांच्या प्रभावामुळे आज (४ सप्टेंबर) पूर्व विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली आणि गोंदिया तसेच उत्तर महाराष्ट्रातील धुळे जिल्ह्यात वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम पावसाचा इशारा (यलो अलर्ट) देण्यात आला आहे. मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात ढगाळ हवामानासह तुरळक सरींची शक्यता आहे. गुरुवारी सोलापूर येथे राज्यातील उच्चांकी ३५.४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. पुढील चार आठवड्यांचा हवामान अंदाज रतीय हवामान विभागाने (IMD) जारी केलेल्या चार आठवड्यांच्या दाजानुसार, राज्यात टप्प्याटप्प्याने पाऊस सक्रिय होईल. 3 ते 10 सप्टेंबर: राज्यभरात सरासरीपेक्षा कमी पाऊस राहण्याची शक्यता. 10 ते 17 सप्टेंबर: विदर्भात पावसाचा जोर वाढेल; सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडण्याचा अंदाज. मुंबईत 12 आणि 13 सप्टेंबरदरम्यान चांगला पाऊस अपेक्षित. 17 ते 24 सप्टेंबर: मराठवाडा आणि लगतच्या भागात पावसाचे जोरदार पुनरागमन होण्याची शक्यता. 24 सप्टेंबर ते 1 ऑक्टोबर: कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रात सरासरीपेक्षा जास्त पाऊस कोसळण्याचा अंदाज आहे. बंगालच्या उपसागरात निर्माण होणाऱ्या नव्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे गणेशोत्सवात चांगल्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

## राजगीर येथे राष्ट्रीय लोक मोर्चाचा तीन दिवसीय राष्ट्रीय विमर्श शिबिर उत्साहात संपन्न

**राजगीर, बिहार :** राष्ट्रीय लोक मोर्चा (RLM) पक्षाचे तीन दिवसीय राष्ट्रीय विमर्श शिबिर दि. २०, २१ व २२ ऑगस्ट २०२६ रोजी राजगीर इंटरनॅशनल कन्व्हेन्शन हॉल, राजगीर (बिहार) येथे अत्यंत उत्साहपूर्ण, शिस्तबद्ध व सौहार्दपूर्ण वातावरणात यशस्वीपणे पार पडले. या राष्ट्रीय शिबिरात देशभरातील प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रीय पदाधिकारी, ज्येष्ठ नेते व कार्यकर्त्यांनी सहभाग घेत पक्षाच्या संघटनात्मक विस्ताराबरोबरच आगामी राजकीय व सामाजिक कार्ययोजनेवर सखोल चर्चा केली.या महत्त्वपूर्ण राष्ट्रीय विमर्श शिबिराला राष्ट्रीय लोक मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्यसभा खासदार आदरणीय श्री. उपेंद्र कुशवाहा जी, बिहार सरकारचे पंचायतराज मंत्री श्री. दीपक प्रकाश कुशवाहा जी, बिहार प्रदेशाध्यक्ष तथा आमदार मा. श्री. आलोक सिंह जी, आमदार मा. श्री. माधव आनंद जी, आमदार श्रीमती स्नेहलता कुशवाहा जी, आमदार मा. श्री. रामेश्वर महतो जी, राष्ट्रीय वरिष्ठ उपाध्यक्ष तथा मीडिया इन्चार्ज मा. श्री. अरविंद वाजपेयी जी आणि राष्ट्रीय उपाध्यक्ष मा. श्री. पृथ्वीराज यादव जी यांच्यासह राष्ट्रीय व प्रदेश स्तरावरील ज्येष्ठ नेत्यांचे महत्त्वपूर्ण मार्गदर्शन लाभले.महाराष्ट्रातील संघटन विस्ताराबाबत उपेंद्र कुशवाहा यांच्याशी विशेष चर्चामहाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब संभाजी पठारे यांना या राष्ट्रीय विमर्श शिबिरासाठी विशेष निमंत्रित करण्यात आले होते. शिबिरादरम्यान राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय श्री. उपेंद्र कुशवाहा जी यांनी बाबासाहेब पठारे यांना स्वतःच्या खासगी दालनात बोलावून महाराष्ट्रातील पक्षाची संघटनात्मक स्थिती, विस्तार आणि आगामी कार्ययोजनेबाबत सविस्तर माहिती घेतली.यावेळी महाराष्ट्रात पक्षाची संघटनात्मक बांधणी मजबूत करणे, अधिकाधिक कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांना पक्षाशी जोडणे, जिल्हा व विधानसभा स्तरावर संघटनात्मक रचना बळकट करणे तसेच आगामी काळात पक्षाचा जनाधार वाढविण्याबाबत महत्त्वपूर्ण चर्चा झाली.आदरणीय श्री. उपेंद्र कुशवाहा यांनी महाराष्ट्रात राष्ट्रीय लोक मोर्चाच्या संघटन विस्तारासाठी सर्वतोपरी सहकार्य व मार्गदर्शन करण्याचे आश्वासन दिले. राष्ट्रीय अध्यक्षांसोबत झालेला हा आत्मीय व सकारात्मक संवाद बाबासाहेब पठारे यांच्यासाठी अत्यंत प्रेरणादायी व उत्साहवर्धक ठरला.देशभरातील प्रदेशाध्यक्षांचा सहभागया राष्ट्रीय विमर्श शिबिरात महाराष्ट्र, दिल्ली, पंजाब, हरियाणा, गुजरात, गोवा, झारखंड, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान, उत्तराखंड, तेलंगणा, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, केरळ व ओडिशा यांसह विविध राज्यांतील प्रदेशाध्यक्ष व प्रतिनिधींनी सहभाग घेतला.तीन दिवस चाललेल्या या शिबिरात राष्ट्रीय नेतृत्व व प्रदेशाध्यक्षांमध्ये संघटनात्मक विषयांवर आत्मीय संवाद झाला. पक्षाचा विस्तार, कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करणे, जनसंपर्क वाढविणे आणि राष्ट्रीय लोक मोर्चाला देशभरात मजबूत व प्रभावी राजकीय संघटना म्हणून उभे करण्याच्या दिशेने सखोल विचारमंथन करण्यात आले.भव्य व उत्कृष्ट आयोजनराष्ट्रीय विमर्श शिबिरासाठी सर्व पदाधिकारी व निमंत्रित प्रतिनिधींसाठी VIP हॉलमध्ये भव्य व सुव्यवस्थित कार्यक्रम, उत्तम भोजन व आतिथ्य व्यवस्था तसेच ५-स्टार हॉटेलमध्ये उत्कृष्ट निवास व्यवस्था करण्यात आली होती. संपूर्ण आयोजनात शिस्त, नियोजन, आपुलकी आणि संघटनात्मक एकजुटीचे दर्शन घडले.राष्ट्रीय नेतृत्व व विविध राज्यांतील प्रदेशाध्यक्षांमध्ये झालेल्या संवादामुळे आगामी काळात पक्षाचे संघटन अधिक प्रभावी करण्यासाठी नवीन दिशा व कार्ययोजनांना गती मिळणार आहे.महाराष्ट्रात संघटन विस्ताराचा संकल्पराष्ट्रीय विमर्श शिबिराबाबत महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब संभाजी पठारे यांनी सांगितले की, राष्ट्रीय अध्यक्ष श्री. उपेंद्र कुशवाहा यांचे मार्गदर्शन आणि महाराष्ट्रातील संघटन विस्तारासाठी त्यांनी दिलेले सहकार्याचे आश्वासन हे महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी आहे.राष्ट्रीय नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका व विधानसभा मतदारसंघापर्यंत राष्ट्रीय लोक मोर्चाचे संघटन पोहोचविणे, नवीन कार्यकर्त्यांना जोडणे आणि पक्षाला मजबूत जनाधार मिळवून देण्यासाठी व्यापक स्तरावर काम करण्यात येईल, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.राजगीर येथे पार पडलेले हे तीन दिवसीय राष्ट्रीय विमर्श शिबिर केवळ बैठक न राहता संघटनेला नवी दिशा, कार्यकर्त्यांना नवी ऊर्जा आणि देशभर पक्ष विस्ताराचा मजबूत संकल्प देणारे महत्त्वपूर्ण अधिवेशन ठरले.या उत्कृष्ट व यशस्वी आयोजनासाठी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब संभाजी पठारे यांनी राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय श्री. उपेंद्र कुशवाहा, बिहार प्रदेशाध्यक्ष, आयोजन समिती, राष्ट्रीय पदाधिकारी, ज्येष्ठ नेते व सर्व कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक आभार मानले.“मजबूत संघटन, मजबूत नेतृत्व आणि जनसेवेच्या संकल्पासह राष्ट्रीय लोक मोर्चाला महाराष्ट्रासह संपूर्ण देशात मजबूत करण्यासाठी आम्ही पूर्ण ताकदीने कार्य करू.”


Education of the Day

YCMOU सेंटर कोड : 21187

YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी

B.A.(मराठी व उर्दू माध्यम)

M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन

9405109103, 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०५ सप्टेंबर २०२६


# शिवाजी महाविद्यालयात भाषा वाङ्मय मंडळाची स्थापना



**कन्नड :** येथील शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात २०२६ - २०२७ या शैक्षणिक वर्षातील भाषा वाङ्मय मंडळाची स्थापना करण्यात आली. (ता. ३ ) विद्यार्थ्यांच्या सुप्त, कला गुणांना वाव मिळून हक्काचे व्यासपीठ मिळावे, लेखन - वाचनाचे मार्गदर्शन व्हावे या उद्देशाने दरवर्षी वाङ्मय मंडळ स्थापन केले जाते. प्रसिद्ध कवयित्री डॉ. प्रतिभा अहिरे यांच्या अध्यक्षतेखाली व मंडळाचे प्रमुख डॉ. शिवाजी हुसे, समिती सदस्य डॉ. रामचंद्र झाडे,डॉ. अलका गडकरी,डॉ. अशोक भोसीकर यांच्या उपस्थितीत कार्यकारिणी निवडण्यात आली. प्रास्ताविक डॉ. अलका गडकरी यांनी केले तर यावेळी डॉ. शिवाजी हुसे, डॉ. रामचंद्र झाडे, डॉ. अशोक भोसीकर यांनी मार्गदर्शन केले. वाङ्मय मंडळाचा उद्देश व कार्य यावर प्रकाश टाकला. अध्यक्षीय समारोप करतांना डॉ. प्रतिभा अहिरे म्हणाल्या की भाषा वाङ्मय मंडळ हे विद्यार्थ्यांना व्यक्त होण्याचे मोठे माध्यम आहे. विद्यार्थ्यांना या सामाजिक वास्तवाचे भान यावे, लेखन वाचनाची प्रेरणा मिळावी आणि विविध उपक्रमातून व्यक्तिमत्व विकास साधावा यासाठी हे वाङ्मय मंडळ कार्यरत असते. यावेळी त्यांनी स्त्री पुरुष समतेची कविता सादर केली. भाषा वाङ्मय मंडळीची कार्यकारिणी निवडण्यात आली.अध्यक्षपदी कु. साक्षी धनेधर तर सचिवपदी कु. पुजा चव्हाण यांची निवड झाली. उर्वरित कार्यकारिणी अशी - उपाध्यक्ष - फिरदोस पठाण, सहसचिव - करण चुंगडे, प्रसिद्धी प्रमुख - रुषिकेश ढवळे, सदस्य - धनंजय लोंढे, सुरज गढेकर, शितल गायकवाड यांची निवड झाली. सर्व पदाधिकाऱ्यांचे प्राचार्य डॉ. विजय भोसले , उपप्राचार्य डॉ. बी. के. मगर, डॉ. अंबादास सगट यांनी अभिनंदन केले.

# मज लाभले ऐसे शिक्षक

मज लाभले ऐसे शिक्षक
ज्यांनी दिले मज ज्ञान
मज मिळाले ऐसे शिक्षक
ज्यांनी केले मज सुजाण...

ऋण शिक्षकांचे आहे
त्यांनी समजावले संस्कार
शीक्षक म्हणजे जिवणाचा
एक भक्कम आधार...

मज अभिमान वाटतो
माझ्या गुरूंचा
त्यांनी विकास केला
माझ्यातल्या गुणांचा...

शिक्षकांनी दिली मज
एक दशा अन् दिशा
त्यांनी फुलवली एका
नवसुमनाची आशा...

मज आहे माझ्या
शिक्षकांचा आदर
कारण तेच माझ्या
आयुष्याचे शिल्पकार...

घाबरणाऱ्याला विश्वास
देतात ते शिक्षक
धडपडणाऱ्याला आधार
देतात ते मार्गदर्शक...

मज लाभले ऐसे शिक्षक
ज्यांनी शिकवले मज स्थैर्य
मज लाभले ऐसे मार्गदर्शक
ज्यांनी दाखवला मज मार्ग...



**कु. स्नेहा मिरा संतोष खोडके**
**सत्यशोधक विद्यालय गोषेगाव**
**ता. भोकरदन जि. जालना**

# मानवतेची बरसात व्हावी

जग सारे कवेत घ्यावे,
नील गगनी मेघ व्हावे;
प्रेमधारा बरसत जावी,
दु:ख-दैन्याची राख व्हावी॥

वृक्षवल्ली डोलत राहावी,
धरती हिरवीगार व्हावी;
पाखरांनी गाणी गावी,
निसर्गाशी प्रीत जुळावी॥

जग सारे सुखी व्हावे,
प्रेमरसात न्हाऊन जावे;
द्वेष-मत्सर दूर सरावे,
माणुसकीचे फूल फुलावे॥

घाम गाळणारा पोशिंदा,
सदैव सुखी, समाधानी राहो;
कष्ट-यातनांचा अंधार सरो,
त्याच्या जीवनात उजेड नांदो॥

भुकेल्या ओठी अन्न मिळावे,
अश्रूंचे हास्यात रूप व्हावे;
अन्याय-अत्याचार मिटावे,
समतेचे सूर निनादावे॥

जगातील सारे दु:ख सरावे,
करुणेचे झरे वाहत राहावे;
ज्ञानदीप अंतरी तेवावा,
बुद्धविचारांनी जग उजळावे॥

नाही कुणी परका जगती,
प्रेम असावे नात्यांत मनी;
मैत्री, करुणा, समता घेऊन,
मानवतेचा दीप उजळावा॥

किर्तिरूपी दीप तेवत राहो,
सत्याचा मार्ग पुढे दिसो;
या सुंदर विश्वाच्या अंगणी,
सुख-शांतीची बरसात व्हावी!

**मधुबानंदा प्रधान,**
**अकोला**

# तहसीलदार ई पीक पाहणी साठी पोहचले थेट शेतकऱ्यांच्या बांधावर




**दौलताबाद (जावेद अहमद)** : तहसीलदार उमेश पाटील सर यांनी मौजे माळीवाडा येथे ई पीक पाहणी करून ई पिक पाहणी बाबत मार्गदर्शन व सूचना दिल्याखरीप हंगाम २०२६ पासून ई-पीक पाहणीच्या पद्धतीत मोठा बदल करण्यात आला असून, आता शेतकऱ्यांना स्वतः मोबाईलवरून पिकांची नोंदणी करावी लागणार नाही.नवीन ई-पीक पाहणी प्रणाली (DCS-MH)सहाय्यक करणार आहेत नोंदणी: शासन नियुक्त केलेले पीक पाहणी सहाय्यक प्रत्यक्ष शेतात जाऊन पिकांची नोंद DCS-MH ॲप मध्ये करतील.जिओ-टॅगिंग फोटो: सहाय्यकांना शेतात जाऊन उभ्या पिकाचे अक्षांश-रेखांश (GPS) सह किमान दोन फोटो अपलोड करणे बंधनकारक आहे.तरी सर्व शेतकरी बांधवांनी ई पीक पाहणी सहायक यांच्याशी संपर्क साधून आपली ई पीक पाहणी करून घ्यावी असे आवाहन तहसीलदार यांनी केले आहेयावेळी यावेळी मंडळ अधिकारी गणेश सोनवणे ग्राम महसूल अधिकारी प्रशांत वनकर, सुरज गिरी ,पीक पाहणी सहायक मिलिंद साठे विशाल वाहूळ यांची उपस्थिती होती




महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०५ सप्टेंबर २०२६

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारविश्वाचे सखोल विश्लेषण: एक जागतिक परिप्रेक्ष्य




प्रा. विवेककुमार हे जेएनयू (नवी दिल्ली) येथे समाजशास्त्राचे अध्यापन करतात. त्यांचे **डीकोडिंग आंबेडकर : आयडियाज ऑफ नेशन अँड नेशन बिल्डिंग** हे पुस्तक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार विश्वाचे एक सखोल विश्लेषण आहे. आधुनिक भारताच्या जडणघडणीचे खरे स्वरूप समजून घ्यायचे असेल तर हे पुस्तक आपण वाचायलाच हवे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना एका विशाल आणि वैश्विक परिप्रेक्षात पाहण्याची दृष्टी यातून मिळते. केवळ दलित बांधवांसाठीच नाही, तर जात, धर्म आणि देशाच्या सीमांच्या पलीकडे जाऊन एक न्याय्य समाज निर्माण करू इच्छिणाऱ्या प्रत्येक नागरिक आणि अभ्यासकाने हे आवर्जून वाचावे असे हे पुस्तक आहे. या पुस्तकाला त्यांनी लिहिलेली प्रस्तावना. हे पुस्तक डॉ. बी.आर. आंबेडकर, जे भारत आणि जगभरातील त्यांच्या अनुयायांमध्ये 'बाबासाहेब आंबेडकर' म्हणून ओळखले जातात, त्यांच्या ज्ञाननिर्मितीच्या विशाल क्षितिजाशी संबंधित चर्चा विश्व मांडण्याचा हा एक प्रयत्न आहे. डॉ. आंबेडकरांना समजून घेण्यासाठी भारतीय मुख्य प्रवाहातील अकादमिक क्षेत्र आणि बुद्धिजीवी वर्गाने स्वीकारलेल्या संक्षेपीकरणवादी (Reductionist) दृष्टिकोनाचे विखंडन (Deconstruction) या पुस्तकातील निबंधामधून करण्याचा प्रयत्न केला आहे. समाजशास्त्र, इतिहास आणि साहित्य या विविध अकादमिक ग्रंथांमधून आंबेडकरांना कसे अदखल (erasure) केले, याची नोंद या पुस्तकात घेण्यात आली आहे. प्रसारमाध्यमे आणि चित्रपट यांसारख्या सर्जनशील क्षेत्रांतील या प्रवृत्तीवरही पुस्तकात प्रकाश टाकला आहे. आंबेडकरांचे महत्त्व कमी करण्याच्या आणि त्यांचे योगदान पुसून टाकण्याच्या या प्रक्रियेला समांतर, हे पुस्तक आंतरराष्ट्रीय संस्था आणि शिक्षणतज्ज्ञांनी आंबेडकरांना कशा प्रकारे स्वीकारले आणि गौरवले आहे, याचाही शोध घेते. एका बाजूला त्यांनी समाज, राजकारण, लोकशाही आणि सामाजिक न्याय यांसारख्या विविध पैलूंवरील आंबेडकरांच्या लेखनाशी स्वतःला जोडून घेतले आहे, तर दुसऱ्या बाजूला त्यांनी आपल्या स्वतःच्या लेखनात आंबेडकरांच्या शैक्षणिक कार्याचा कशा प्रकारे आदरपूर्वक उल्लेख केला आहे, हे यात मांडले आहे. पुस्तकाचे दुसरे प्रकरण हे हिंदू समाजव्यवस्थेविषयी आंबेडकरांनी मांडलेल्या मूलभूत आणि वैशिष्ट्यपूर्ण तात्विक व तत्वज्ञानात्मक दृष्टिकोनाचा आढावा घेते. व्यक्तीचे स्थान, वर्णव्यवस्था, जातिव्यवस्थेची उत्पत्ती आणि तिचे उच्चाटन या विषयांचा त्यांनी सखोल विचार केला आहे. हिंदू समाजव्यवस्था मुक्त का नाही आणि ती व्यक्तीच्या गरजांपुढे अधीन का असावी, याचे विश्लेषण त्यांनी केले आहे. ‘अतिरिक्त पुरुष’ (surplus men), ‘अतिरिक्त स्त्रिया’ (surplus women) आणि बाह्यविवाहाऐवजी अंतर्विवाहाची सक्ती या संकल्पनांच्या माध्यमातून त्यांनी भारतातील जातिव्यवस्थेच्या उत्पत्तीविषयी एक नवा सिद्धांत मांडला आहे. फ्रेंच समाजशास्त्रज्ञ गॅब्रिएल टार्ड यांच्या ‘अनुकरणाचा नियम’ याचा संदर्भ देत त्यांनी जातिव्यवस्थेच्या प्रसाराचे कारण स्पष्ट केले आणि या क्षेत्रातील संशोधनासाठी एक नवीन दृष्टीकोन उपलब्ध करून दिला. शेवटी, आंतरजातीय विवाहांचा स्वीकार, हिंदू धर्मग्रंथांच्या वैधतेवर प्रश्नचिन्ह उभे करणे आणि एका विशिष्ट जातीकडील पुरोहितपदाच्या मक्तेदारीचा अंत करणे अशा उपायांद्वारे जातिव्यवस्थेच्या निर्मूलनाची योजना त्यांनी मांडली आहे. तिसरे प्रकरण हे सामाजिक न्यायाच्या सिद्धांतावर आधारित आहे, विशेषतः डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक न्यायाच्या दृष्टिकोनावर. आंबेडकरांनी स्वतंत्रपणे सामाजिक न्यायाचा सिद्धांत मांडलेला नसला, तरी प्लेटो आणि रॉल्स यांसारख्या विचारवंतांनी मांडलेल्या सामाजिक न्यायाच्या मूलभूत तत्त्वांच्या आधारे त्यांच्या लेखन व भाषणांमधील घटकांचा शोध येथे घेण्यात आला आहे. मी आंबेडकरांच्या सामाजिक न्यायाच्या सिद्धांताची पाच वैशिष्ट्ये जाणली आहेत: समाजात व्यक्तीचा विकास स्वतंत्र आणि स्वायत्त घटक म्हणून व्हावा; समानता, स्वातंत्र्य आणि बंधुता या तत्त्वांवर तो आधारित असावा; सामाजिक, आर्थिक आणि राजकीय समानतेवर आधारित खऱ्या लोकशाहीची स्थापना व्हावी; संविधानिक उपाययोजनांद्वारे लोकशाहीची अंमलबजावणी करावी आणि तथाकथित उच्चवर्गाच्या राजकीय सत्तेवरील मक्तेदारी मोडून सामाजिक न्याय प्रस्थापित करावा. प्रकरण चार हे राष्ट्र आणि राष्ट्रनिर्मितीविषयी आंबेडकरांच्या विचारांवर आधारित आहे. त्यांच्या शैक्षणिक आणि वैचारिक लेखनातील हा एक अत्यंत महत्त्वाचा पैलू आहे. समकालीन भारतीय समाजातही हा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा असून भविष्यातही तितकाच सुसंगत राहील. माझ्या मते, आंबेडकरांनी काही मोजक्या विचारवंतांसह हे अधोरेखित केले की, भारत हे राष्ट्र पूर्णतः तयार झालेले नसून ते घडण्याच्या प्रक्रियेत आहे. राष्ट्र म्हणजे काय आणि व्यक्तीच्या अधिकारांच्या आधारे राष्ट्राची व्याख्या कशी करता येते, हे त्यांनी स्पष्ट केले. राष्ट्रनिर्मितीसाठी संविधान कोणते स्त्रोत उपलब्ध करून देते, हेही त्यांनी सांगितले. तसेच इतिहासाचे विस्मरण हा राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेतील एक महत्त्वाचा घटक असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. या प्रकरणात आंबेडकर हे भारताच्या फाळणीच्या बाजूने नव्हते, हेही नोंदवले आहे. तथापि, राष्ट्रनिर्मितीसाठी वंचित घटक, जसे की पूर्वाश्रमीचे अस्पृश्य, आदिवासी आणि अल्पसंख्याक यांना शासनसंस्थांमध्ये प्रतिनिधित्व मिळावे, यासाठी ते कटिबद्ध होते. त्याचप्रमाणे, स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने समान अधिकार मिळावेत, यासाठीही ते आग्रही होते. राष्ट्रनिर्मितीपुरतेच नव्हे, तर राष्ट्राची एकता आणि अखंडता टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक तत्त्वेही त्यांनी मांडली. डॉ. आंबेडकरांच्या मते, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही त्रयी एकत्र नांदली तरच राष्ट्राचा विकास शक्य आहे. या सर्व संकल्पना आणि मांडणींमुळे आंबेडकर एक उत्कृष्ट समाजशास्त्रज्ञ म्हणून सिद्ध होतात आणि भारतीय समाजशास्त्राच्या अनेक संस्थापकांपैकी एक म्हणून त्यांना मानावे लागते. या पुस्तकाचा मुख्य गाभा म्हणजे त्याचा वैशिष्ट्यपूर्ण दृष्टिकोन, आपण त्याला वंचितांचा दृष्टिकोन (Perspective From Below) म्हणतो. देकार्त, लॉक, कांट, दुर्खाइम, मिल्स, बर्जर आणि लकमॅन, बोर्द्यू, कूह्न, ोलऊापफ्रेरे इत्यादी विचारवंतांच्या संदर्भांचा आधार घेत हा दृष्टिकोन विकसित करण्यात आला आहे. या दृष्टिकोनाच्या आधारे आंबेडकरांच्या ज्ञाननिर्मितीविषयीची चर्चा मुख्य प्रवाहापासून वेगळी करण्यात आली आहे. मुख्य प्रवाहाने आंबेडकरांना प्रामुख्याने दलित नेते किंवा दलितांच्या स्थितीच्या उन्नतीसाठी संघर्ष करणारे कार्यकर्ते म्हणूनच पाहिले आहे, याची आम्हाला जाणीव आहे. थोडक्यात, या पुस्तकाने आपल्या वैशिष्ट्यपूर्ण तात्विक आणि पद्धतशास्त्रीय दृष्टिकोनातून या चर्चेला पुढे नेण्याचा प्रयत्न केला आहे. दलित विचारसरणी केवळ अनुभवाधारित माहितीच्या निर्मिती आणि विश्लेषणापुरती मर्यादित नसून, ती विविध प्रकारच्या सैद्धांतिक आणि संकल्पनात्मक मांडणी विकसित करू शकते आणि राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील सामाजिक, राजकीय, धार्मिक आणि शैक्षणिक घडामोडींचे विश्लेषण करू शकते, असे या पुस्तकात मांडण्यात आले आहे. या दृष्टीने, आंबेडकरांच्या शैक्षणिक योगदानाचे विश्लेषण इतर भारतीय, युरोपीय किंवा अमेरिकन समाजशास्त्रज्ञांच्या तोडीस तोड झाले आहे. हे पुस्तक समकालीन आणि भावी समाजशास्त्रज्ञांना विद्यमान चौकटींपलीकडे जाऊन नवे दृष्टिकोन विकसित करण्यासाठी प्रेरणा देईल, ज्यामुळे त्यांच्या ज्ञाननिर्मितीतून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय शैक्षणिक बंधुभावाचा मार्ग सुकर होईल अशी मला आशा वाटते.

**डीकोडिंग आंबेडकर : आयडियाज ऑफ नेशन अँड नेशन बिल्डिंग**
**लेखक : विवेक कुमार**
**प्रकाशक : मनोहर पब्लिशर्स अँड डिस्ट्रिब्यूटरर्स**
**पृष्ठे: १४२ / किंमत: रु ८९५**



# २१ व्या शतकातील जोकर - CHB

२१ व्या शतकात भारत चांद्रयान चंद्रावर पाठवत आहे, पण त्याच भारतात एक उच्चशिक्षित वर्ग रस्त्यावरील बिगाऱ्यापेक्षाही वाईट जीवन जगत आहे. त्याचे नाव आहे - CHB प्राध्यापक. CHB म्हणजे Clock Hour Basis. नाव जरी आधुनिक वाटत असले, तरी ही आधुनिक गुलामगिरी आहे. समाज यांना आज दुसऱ्या नावाने ओळखतो - कॉलेजचा जोकर. **त्यालाही घर आहे, आई-वडील, बहीण-भाऊ आहेत...** या प्राध्यापकाला पण कुटुंब आहे. त्यालाही आपल्या चिमुकल्यांना चांगले कपडे, चांगले शिक्षण द्यायचे आहे. आई-वडिलांच्या औषधाचा खर्च भागवायचा आहे. पण त्याची आर्थिक परिस्थिती सांगावी तरी कशी ? विचार करा, एका CHB प्राध्यापकाला काय पगार असेल? उत्तर एकच आहे - रस्त्यावर गड्डे खोदणाऱ्या मजुराएवढा, किंबहुना त्याच्यापेक्षाही कमी. आज पाचवी-नापास माणूस माती काम करून दिवसाला ८०० ते १२०० रुपये कमावतो. पण NET, SET, Ph.D. झालेला प्राध्यापक तासावर मोजला जातो. तासाला 800-9०० रुपये.आणि तेही फक्त ८-9 महिने. उरलेले 3- 4 महिने तो बेरोजगार. **जॉइनिंगच्या दिवशीच निरोपाची तारीख ठरलेली असते,** CHB प्राध्यापकाला जॉइनिंग देतानाच सांगितले जाते - तुला अमुक तारखेपासून अमुक तारखेपर्यंत काम आहे. त्यानंतर पुढच्या वर्षी तुला त्याच कॉलेजमध्ये ठेवतील की नाही, याची कोणतीही शाश्वती नाही. म्हणजे तो कायम भीतीत. त्याला वाटते, मी जर प्राचार्यांचे, संस्थाचालकांचे, कायम प्राध्यापकांचे ऐकले नाही, तर पुढच्या वर्षी मला काढून टाकतील. **म्हणून तो सगळे सहन करतो.** काम असो वा नसो, वर्ग असो वा नसो, त्याला रोज कॉलेजला यावेच लागते. सकाळी ते दुपार- संध्याकाळी पर्यंत विनाकारण बसून राहावे लागते. परमनंट प्राध्यापकांच्या बरोबरीने त्याला तास-न-तास बसवून ठेवतात, पण त्याला बसायला हक्काची खुर्ची नसते. कुठेतरी कोपऱ्यात एक खुर्ची टाकून दिली जाते आणि सांगितले जाते - इथेच बस.तो थोडा जरी इकडे-तिकडे गेला की लगेच चौकशी - तू इथे का गेलास? तिथे का बसलास? असे का बोललास? तसे का केले नाहीस? सतत टोमणे, सतत अपमान. **काम सगळे त्याचे, नाव सगळे दुसऱ्यांचे** कॉलेजमधील NAAC चे काम, विद्यार्थ्यांचे रोस्टर, प्रत्येक कार्यक्रमाची तयारी, फाईल्स भरणे - ही सगळी कामे कायम प्राध्यापकांची असतात, पण ती करून घेतली जातात CHB कडून.कायम प्राध्यापकांच्या हाताखाली हे CHB म्हणजे त्यांचे गुलाम किंवा जोकरच आहेत. त्यांचा वापर फक्त मजुरासारखा करून घेतला जातो, तोही फक्त 8-9 महिने. 8-9 महिने त्यांच्याकडून सगळे काम करून घ्यायचे आणि नंतर 3-4 महिने त्यांना वाऱ्यावर सोडून द्यायचे.आणि त्या 3-4 महिन्यांत काय? तोच प्राध्यापक, जो वर्गात संविधान शिकवतो, तोच उन्हाळ्यात कोणाच्या तरी बंगल्यावर वॉचमन म्हणून, माळी म्हणून, माती कामगार म्हणून काम शोधतो. आपल्या लहान मुलांच्या आणि म्हाताऱ्या आई-वडिलांच्या पोटासाठी तो ही लाजिरवाणी तडजोड करतो. परमनंट प्राध्यापकाप्रमाणे त्याला सर्व कामे करावी लागतात. परिक्षेची सर्व कामे त्यांच्या कडून करून घेतली जातात मात्र त्याचा पगार दिला जात नाही. **प्राध्यापकाला मन नसते का?** त्यालाही स्वाभिमानाने जगण्याचा अधिकार आहे ना? पण त्याने CHB नावाचा जोकरचा मुखवटा गळ्यात अडकवून घेतला आहे, त्यामुळे आता मागेही जाता येत नाही.जे लोक शाळाही शिकले नाहीत, त्यांनी कंत्राटदारी केली, व्यवसाय केला आणि आज ते मोठ्या बिल्डिंगमध्ये राहतात. आणि आम्ही शिक्षण घेऊन प्राध्यापक होण्याचे स्वप्न पाहिले, ते स्वप्न आज धुळीत मिळाले आहे. आम्ही आमच्या लेकरांना त्यांच्या आवडीची एक वस्तूही घेऊन देऊ शकत नाही, त्यांना चांगले शिक्षण, चांगले आरोग्य देऊ शकत नाही.म्हणून आज समाज आम्हाला हंगामी मजूर, धाडी मजूर म्हणतो. लोकांच्या नजरेत प्राध्यापकाची प्रतिमा आता तुच्छ झाली आहे.खरंच, आज वाटते - शिक्षण घेऊन चूक तर केली नाही ना? शिक्षण न घेता मजुरी केली असती, तर निदान लाज वाटली नसती. पण एवढे शिकून आज मजुरी करायला जावे लागते, तेव्हा स्वतःचीच लाज वाटते. **आम्हीच आहोत २१ व्या शतकातील जोकर. C H B - Certified Highly Buffoon.** समाजाच्या बोटावर नाचणारे, आमच्या हालचाली पाहून लोक हसतात, पण आमच्या आतला आक्रोश कोणालाच ऐकू येत नाही.शासनाने आणि विद्यापीठांनी आता तरी विचार करावा. हा जोकर नाही, हा देशाचा घडवणारा गुरु आहे. त्याला किमान जगण्यापुरते वेतन, १२ महिन्याची सुरक्षा आणि माणूस म्हणून सन्मान द्या. नाहीतर उद्या वर्गात शिकवायला कोणीच उरणार नाही.


**अनिल लक्ष्मणराव जाधव**

**+९१७७९६१८२६७३**



